मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर

# वार्षिक पुरस्कार २०२५

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर

# वार्षिक पुरस्कार २०२५

# mcci वार्षिक पुरस्कार २०२५

कै. गो. स. पारखे
**नावीन्यपूर्ण उत्पादन पुरस्कार**



**उमेश कुलकर्णी**
कोणार्क फिल्टर्स प्रा. लि.



**रोहन जाधव**
उज्ज्वल इंजिनीअरिंग वर्क्स

कै. रमाबाई जोशी
**महिला उद्योजकता पुरस्कार**



**डॉ. अनुया निसाळ, डॉ. स्वाती शुक्ला**
सेरिजेन मेडिप्रॉडक्ट्स



**लक्ष्मी बेहेरे**
विचक्राफ्ट इनोव्हेशन्स एलएलपी

ब्रिगेडिअर एस बी घोरपडे
**संरक्षण क्षेत्रातील सूक्ष्म, लघु अथवा मध्यम उद्योगांमधील पुरस्कार**



**नीलेश धांडे**
फोर्टी टू टेक्नॉलॉजी इनोव्हेशन्स प्रा. लि.



**ईर्शाद खान**
इयूस न्युमरिक्स प्रा. लि.

कै. किरण नातू
**प्रथम पिढीतील उद्योजकता पुरस्कार**



**धनंजय अभंग**
क्लीनर्जी टेक सोल्युशन्स प्रा. लि.

कै. बी. जी. चितळे
**कुटुंबाधारित उद्योगांमधील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार**



**मृणाल जोशी**
नायक्रोम इंडिया लिमिटेड

कै. बी. जी. देशमुख (आयएएस)
**उद्योगांच्या सामाजिक जबाबदारीमधील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार**



**जया लुहाना**
टेक महिंद्रा फाऊंडेशन



**निरंजन किर्लोस्कर**
फ्लीटगार्ड फिल्टर्स प्रा. लि.

एस. एल. किर्लोस्कर
**सर्वोत्कृष्ट निर्यात कामगिरी पुरस्कार**



**शिरीष पांडे**
अमेय प्रिसिजन इंजिनीअरिंग लिमिटेड

केपीआयटी टेक्नॉलॉजीज् लि.
**शाश्वत उपक्रम पुरस्कार**



**राजीव जैन**
केएसबी लिमिटेड

डॉ. आर. जे. राठी
**हरित उपक्रम पुरस्कार**



**शिवम सिंह**
एक्सप्लोरिट नेक्स्टजेन सोल्युशन्स प्रा. लि.

# कै. गो. स. पारखे
# नावीन्यपूर्ण उत्पादन पुरस्कार

उद्योजकतेतील सर्जनशीलतेकरिता गो. स. पारखे यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो. पारखे समूहाचे कै. बाबूरावजी पारखे यांनी आपले धाकटे बंधू, सर्जनशील उद्योजक गो. स. पारखे यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी या पुरस्काराची सुरुवात केली. देशातील सर्वात जुना उद्योजकता पुरस्कार म्हणून याची ओळख आहे. सर्जनशील उत्पादने, प्रक्रिया, रचना, सेवा किंवा आयातीला पर्यायी उपाययोजना देत उत्कृष्ट सेवा देणाऱ्या विविध उद्योजकांना सन १९४७ पासून हा पुरस्कार दिला जात आहे. ७८ वर्षांचा वारसा असलेला हा पुरस्कार बाजारपेठेत मान्यता मिळालेल्या सर्जनशील कल्पना आणि उद्योजकीय उत्कृष्टतेचे प्रतीक आहे. यासाठी कडक मूल्यांकन प्रक्रियेतून पुरस्कारार्थींची निवड केली जाते. आतापर्यंत चारशेहून अधिक उद्योजकांना हा सन्मान प्राप्त झाला आहे. ट्रॉफी, पदक आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**निवड समिती**

**रवींद्र बाम**
संचालक,
साज ट्रिमिंग्ज प्रा. लि.

**आनंद बाम**
व्यवस्थापकीय संचालक,
पॅकेज सिस्टिम्स इंडिया प्रा. लि.

**व्ही. के. महाजन**
व्यवस्थापकीय संचालक,
युनि-ऑटोमेशन प्रा. लि.

**संजय जोशी**
माजी व्यवस्थापकीय संचालक,
जिंकू रेडिएटर्स प्रा. लि.

**राम जोगदंड**
व्यवस्थापकीय संचालक,
रेमलेक्स प्रा. लि.

**मानसी बिडकर**
संचालक,
मेलक्स कंट्रोल गिअर्स प्रा. लि.

**राजेश कुलकर्णी**
व्यवस्थापन
सल्लागार

**प्रदीप कुलकर्णी**
पार्टनर,
डायनॅमिक इंजिनीअरिंग अँड सोल्युशन्स

**मंदार पारखी**
संचालक,
मार्क डिझाईन सोल्युशन्स प्रा. लि.

**सतीश जोशी**
सहयोगी संचालक,
एमसीसीआयए

'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' चा

पुरस्कारार्थी

# नावीन्यपूर्ण उत्पादन पुरस्कार

**कै. गो. स. पारखे स्मृत्यर्थ**

'कोणार्क फिल्टर्स प्रा. लि.' चे (केएफपीएल) व्यवस्थापकीय संचालक उमेश व्यंकटेश कुलकर्णी यांनी १९८४ मध्ये एलआयटी, नागपूर येथून केमिकल इंजिनीअरिंगमध्ये पदवी प्राप्त केली. त्यांच्या नावावर पन्नासहून अधिक इंडस्ट्रिअल इनोव्हेशन्स आणि अनेक पेटंट्स आहेत. सॉलिड-लिक्विड सेपरेशन, पर्यावरण संरक्षण आणि प्रोसेस ऑप्टिमायझेशन या वैशिष्ट्यपूर्ण सेवा 'केएफपीएल' च्या वतीने दिल्या जातात. ऑटोमोबाईल, इंजिनीअरिंग, केमिकल, साखर उद्योग, डिस्टिलरी आणि महापालिका क्षेत्राला कंपनीकडून सेवा दिली जाते.

स्वदेशी तंत्रज्ञान, संशोधन व विकासाचे भक्कम पाठबळ आणि सर्वोत्तम ऑटोमेशनच्या साहाय्याने कंपनीने डझनाहून अधिक विविध फिल्टरेशन प्रॉडक्ट्सची निर्मिती केली आहे. 'केएफपीएल' चे प्रत्येक उत्पादन तयार करताना शाश्वतता, वाया जाण्याचे किमान प्रमाण, खर्चात कपात, ऑटोमेशन आणि कार्बन फूटप्रिंट कमी करण्यावर भर असतो. सातत्यपूर्ण आणि स्वयंचलित प्रेशर आणि व्हॅक्यूम बेल्ट फिल्टर्स हे 'केएफपीएल' च्या संशोधनातील महत्त्वाचे टप्पे आहेत.



**उमेश कुलकर्णी**
व्यवस्थापकीय संचालक

**कोणार्क फिल्टर्स प्रा. लि.,**
चौथा मजला, रामध्वज कॉम्प्लेक्स,
वसंत बाग सोसायटी, महर्षी नगर,
पुणे-सातारा रस्ता, पुणे - ४११ ०३७
• ई-मेल : umesh.kulkarni@konarkfiltersindia.com

'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' चा

पुरस्कारार्थी

# नावीन्यपूर्ण उत्पादन पुरस्कार

**कै. गो. स. पारखे स्मृत्यर्थ**

उज्ज्वल इंजिनीअरिंगचे वर्क्सचे मालक असलेले तरुण उद्योजक रोहन जाधव यांनी भारतीय एमएसएमई कंपन्यांपर्यंत प्रगत उत्पादन तंत्रज्ञान पोहोचविण्याचे ध्येय उराशी बाळगलेले आहे. मशीन डिझाईन आणि हायड्रॉलिक्समधील कामाचा प्रत्यक्ष अनुभव गाठीशी धरून त्यांनी प्रत्यक्ष शॉप-फ्लोअरवर काम करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. महागड्या सीएनसी आणि सर्व्हो-आधारित तंत्रज्ञानामुळे लहान उत्पादकांना समस्या जाणवतात.

जाधव यांनी इंटेलिजंट इंजिनीअरिंग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ही अडचण दूर करण्याचे ठरविले. त्यांनी निर्माण केलेल्या हायड्रॉलिक पॉलिगॉन टर्निंग मशीनमधून हे ध्येय साध्य झाले. या माध्यमातून सीएनसी दर्जाचे उत्पादन करता येते. शिवाय, पैसा आणि वीजखर्चाचे प्रमाणही अत्यल्प असते. जाधव हे लहान उद्योगांचे सक्षमीकरण, शाश्वत उत्पादन प्रक्रियेला प्रोत्साहन दिले व मेक इन इंडिया चळवळीला बळकटी देण्यासाठी व्यावहारिक, विस्तारक्षम इंजिनीअरिंग क्षमतांचा वापर करून सातत्याने स्वदेशी उपाययोजना मांडत आहेत.



**रोहन श्रीधर जाधव**
प्रोप्रायटर

**उज्ज्वल इंजिनीअरिंग वर्क्स,**
२६/ १, ब्लॉक एफ २, एमआयडीसी,
पिंपरी, पुणे - ४११ ०१८
• ई-मेल : contact@ujwalengineering.com

# कै. रमाबाई जोशी
# **महिला उद्योजकता पुरस्कार**

महिला उद्योजकांना प्रोत्साहन म्हणून, तसेच त्यांना स्वतंत्र ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने कै. रमाबाई जोशी यांच्या स्मरणार्थ १९७४ मध्ये या पुरस्काराची सुरुवात झाली. घरगुती आणि दैनंदिन वापरासाठी आवश्यक उत्पादने, प्रक्रिया आणि उपकरणे विकसित करून सर्जनशीलता दर्शविणाऱ्या महिला उद्योजकांना हा पुरस्कार दिला जातो. नावीन्य आणि शाश्वतता या दोन गोष्टींचा जवळचा संबंध अधोरेखित करून, व्यावहारिक, पर्यावरणपूरक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या उपाययोजनांचा या पुरस्काराने सन्मान केला जातो. महिलांना विविध नावीन्यपूर्ण उद्योगांसाठी प्रोत्साहन देण्याकरिता या पुरस्काराची सुरुवात झाली. सक्षमीकरण, सर्जनशीलता आणि शाश्वत विचारांचे प्रतीक म्हणून हा पुरस्कार ओळखला जातो. भारतातील औद्योगिक विश्वात महिलांचा सहभाग वाढविण्यात या पुरस्काराचे मोठे योगदान आहे. ट्रॉफी आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

**निवड समिती**

**रवींद्र बाम**
संचालक,
साज ट्रिमिंग्ज प्रा. लि.

**आनंद बाम**
व्यवस्थापकीय संचालक,
पॅकेज सिस्टिम्स इंडिया प्रा. लि.

**व्ही. के. महाजन**
व्यवस्थापकीय संचालक,
युनि-ऑटोमेशन प्रा. लि.

**संजय जोशी**
माजी व्यवस्थापकीय संचालक,
जिंकू रेडिएटर्स प्रा. लि.

**राम जोगदंड**
व्यवस्थापकीय संचालक,
रेमलेक्स प्रा. लि.

**मानसी बिडकर**
संचालक,
मेलक्स कंट्रोल गिअर्स प्रा. लि.

**राजेश कुलकर्णी**
व्यवस्थापन
सल्लागार

**प्रदीप कुलकर्णी**
पार्टनर,
डायनॅमिक इंजिनीअरिंग अँड सोल्युशन्स

**मंदार पारखी**
संचालक,
मार्क डिझाईन सोल्युशन्स प्रा. लि.

**सतीश जोशी**
सहयोगी संचालक,
एमसीसीआयए

SERIGEN

mccia®

'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चर' चा

पुरस्कारार्थी

# महिला उद्योजकता पुरस्कार

**कै. रमाबाई जोशी स्मृत्यर्थ**

'सेरिजेन' ही वैद्यकीय उपकरणे तयार करणारी कंपनी असून, पेशीसमूहांवर उपचारांकरिता (टिश्यू रिपेअर) सिल्क प्रोटीन तंत्रज्ञान कंपनीने विकसित केले आहे. कंपनीचे सेरिऑस (Serioss) हे अस्थिरुग्णांवरील उपचारांसाठी उपयुक्त ठरणारे उत्पादन असून, ते जगातील पहिले वैद्यकीय मान्यताप्राप्त सिल्क-बेस्ड बोन व्हॉईड फिलर आहे. बोन रिस्टोरेशनबाबत कंपनीने लक्षणीय कामगिरी केली आहे.

कंपनीने सेरिडर्म (Seriderm) नावाचे आणखी एक अद्ययावत उत्पादन सादर केले आहे, जे डायबेटिक्स, अल्सर्स, भाजल्यामुळे होणाऱ्या जखमा, तसेच बेड सोअर झालेल्या रुग्णांसाठी उपयुक्त आहे. 'सेरिजेन' ला आयएसओ प्रमाणपत्र मिळाले असून, या प्रकल्पाला उत्पादन आणि विक्रीसाठी सरकारी मान्यता आहे. तसेच यूएस-एफडीए 510K परवाना मंजुरीची प्रतीक्षा आहे. उत्कृष्ट टीमच्या नेतृत्वाखाली, सेरिजेन कंपनी पेशीसमूह उपचारप्रक्रियेत जागतिक बाजारपेठेत क्रांती घडविण्यासाठी सज्ज आहे.



**डॉ. अनुया निसाळ**
सहसंस्थापक आणि सीईओ

**डॉ. स्वाती शुक्ला**
सहसंस्थापक आणि सीओओ

**सेरिजेन मेडिप्रॉडक्ट्स,**
प्लॉट ३९, इलेक्ट्रॉनिक को-ऑप
इंडस्ट्रिअल इस्टेट,
पर्वती, पुणे - ४११ ००९
• ई- मेल : swati@serigenmed.com

'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' चा

पुरस्कारार्थी

# महिला उद्योजकता पुरस्कार

**कै. रमाबाई जोशी स्मृत्यर्थ**

लक्ष्मी मृगेंद्र बेहेरे यांच्या दृष्टीने भविष्यकाळात प्रजाती म्हणून टिकून राहण्यासाठी नव्या शाश्वत संसाधनांकडे पाहण्याकरिता सर्जनशील दृष्टिकोन आणि डिझाईन थिंकिंग ही काळाची गरज आहे. त्या वेगवेगळ्या जैविक साधनांचा वापर करून वस्तूंची निर्मिती करतात. त्यांच्याकडील वस्तूंसाठी पाण वनस्पती आणि केळीच्या खोडाचे तंतू हा कच्चा माल वापरला जातो. त्यांची WITCHCRAFT ही स्टार्टअप कंपनी आहे. त्यांना प्रामुख्याने कापड उद्योगात रस आहे. पर्यावरणाचा समतोल राखत त्याला पारंपरिक कलाकौशल्याशी जोडण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

WITCHCRAFT मध्ये पाणवनस्पतींपासून पादत्राणे तयार केली जातात. तसेच, बनाना फायबर, ताग आणि वेताचा वापर करून फर्निचर, घरातील सजावटीच्या वस्तूंची निर्मिती केली जाते. ही कंपनी पूर्णपणे महिलांमार्फत चालविली जाते. तसेच जुने पारंपरिक ज्ञान आणि नावीन्याची प्रभावीपणे सांगड घालून पर्यावरणपूरक वस्तू घरोघरी पोहोचविण्याचे काम केले जाते.



**लक्ष्मी मृ. बेहेरे**
पार्टनर

**विचक्राफ्ट इनोव्हेशन्स एलएलपी,**
३०२, जय नर्मदा सी.एच.एस., लेन क्र. ११,
प्रभात रोड, पुणे - ४११ ०४
• ई-मेल : laxmi.behere@gmail.com

# ब्रिगेडिअर एस बी घोरपडे
# संरक्षण क्षेत्रातील सूक्ष्म, लघु अथवा मध्यम उद्योगांमधील पुरस्कार

भारत सरकारच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) प्रोत्साहन देण्यासाठी ब्रिगेडिअर एस बी घोरपडे संरक्षण क्षेत्रातील सूक्ष्म, लघु अथवा मध्यम उद्योगांमधील पुरस्कार दिला जातो. संरक्षण उत्पादने, यंत्रणा आणि तंत्रज्ञानाचा विकास आणि पुरवठा करताना स्वदेशी क्षमता आणि राष्ट्रीय आत्मनिर्भरतेला चालना देणाऱ्या एमएसएमई कंपन्यांचा सन्मान या पुरस्काराने केला जातो. नावीन्य, गुणवत्ता आणि संरक्षणसज्जता यासंदर्भात देशाच्या धोरणात्मक आणि औद्योगिक उद्दिष्टांचा विकास करण्यात एमएसएमईज्ची महत्त्वाची भूमिका या पुरस्काराने अधोरेखित केली जाते. संरक्षण उत्पादनांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी आणि प्रमाणपत्र असे आहे.

**निवड समिती**

**महेश फडके**
चेअरमन,
एमसीसीआयए डिफेन्स कमिटी

**डॉ. विश्वास उडपीकर**
संचालक,
वेव्हलेट टेक्नॉलॉजीज् प्रा. लि.

**हर्षवर्धन गुणे**
को-चेअरमन,
एमसीसीआयए डिफेन्स कमिटी

**वरुण खंदारे**
संचालक,
एसआरजीएफ स्ट्रॅटेजिक रीसर्च ग्रोथ फाऊंडेशन

**प्रशांत जोगळेकर**
संचालक,
एमसीसीआयए

FORTYTWO
SECURE TODAY. FUTURE READY.

mcci®
'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चर' चा

**पुरस्कारार्थी**

# संरक्षण क्षेत्रातील सूक्ष्म, लघु अथवा मध्यम उद्योगांमधील पुरस्कार

**ब्रिगेडिअर एस बी घोरपडे यांच्या वतीने**

फोर्टी टू लॅब्स ही डीप-टेक सायबर सिक्युरिटी कंपनी आहे. या कंपनीकडून संरक्षण, वित्तीय व संवेदनशील राष्ट्रीय यंत्रणांकरिता अत्याधुनिक डिजिटल ट्रस्ट पायाभूत सुविधांची निर्मिती केली जाते. कंपनीची स्थापना २०१६ मध्ये झाली असून, पोस्ट-क्वांटम क्रिप्टोग्राफी, सिक्योर आयडेंटिटी, अॅक्सेस कन्ट्रोल, एपीआय सुरक्षा आणि डेटा संरक्षण सुविधा ही त्यांची खास वैशिष्ट्ये आहेत.

फोर्टी टू लॅब्सचा प्रमुख प्लॅटफॉर्म π-कंट्रोलच्या माध्यमातून एकात्मिक क्रिप्टोग्राफी-फर्स्ट सिक्युरिटी फॅब्रिक सुविधा प्रदान केली जाते. याअंतर्गत अत्यंत संवेदनशील वातावरणात यंत्रे, अॅप्लिकेशन्स व डेटाचे संरक्षण करता येते. कंपनीमार्फत तयार झालेले तंत्रज्ञान हे प्रामुख्याने संरक्षण तसेच इतर महत्त्वपूर्ण ठिकाणी वापरले जाते. राष्ट्रीय सायबर रेझिलिअन्स मजबूत करीत पारंपरिक सुरक्षा मॉडेल्सवरील अवलंबित्व कमी करण्याचा हेतू यामागे आहे. ही कंपनी सायबरसुरक्षा यंत्रणेत सक्रिय योगदान देत आहे.



**नीलेश धांडे**
सहसंस्थापक आणि सीईओ

**फोर्टी टू टेक्नॉलॉजी इनोव्हेशन्स प्रा. लि.,**
२०१ ए, सिद्ध आयकॉन,
बाणेर रोड, पुणे - ४११ ०४५
• ई-मेल : nilesh.dhande@fortytwo42.in

ZEUS NUMERIX

mcci
'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड अ‍ॅग्रिकल्चर' चा

प्रशस्तिपत्र

# संरक्षण क्षेत्रातील सूक्ष्म, लघु अथवा मध्यम उद्योगांमधील पुरस्कार

**ब्रिगेडिअर एस बी घोरपडे यांच्या वतीने**

'झ्यूस न्यूमरिक्स' ही स्मार्ट आणि ऑटोनॉमस म्युनिशन (स्वायत्त युद्धसामग्री) उत्पादनांची निर्मिती करणारी संरक्षण क्षेत्रातील कंपनी आहे. या कंपनीला AS9100, ISO 9001 (एरोस्पेस आणि डिफेन्स डिझाईन), ISO 27001 (डेटा सुरक्षा) आणि CMM लेव्हल तीन अशी प्रमाणपत्रे मिळाली आहेत. कंपनीने चाळीसहून अधिक ग्राहकांसाठी पस्तीसपेक्षा अधिक सॉफ्टवेअर डिझाईन केली आहेत. याबरोबरच, डीआरडीओ, संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक कंपन्या, तसेच खासगी कंपन्यांबरोबर मिळून तब्बल सहाशेहून अधिक प्रकल्प पूर्ण केले आहेत.

झ्यूस कंपनीने iDEX अंतर्गत ८१ एमएम मॉर्टर (लहान तोफ) करिता प्रिसिजन गायडन्स किट तयार केले असून, त्याची चाचणी यशस्वीपणे पार पडली आहे. याशिवाय, कंपनीने १२० एमएम प्रिसिजन गायडन्स किटचे काम सुरू केले आहे. याची निर्यातक्षमता अधिक आहे. मॉर्टर्सव्यतिरिक्त 'झ्यूस' कडून युएव्ही वेपनायझेशन किटसंदर्भातही काम सुरू आहे. या किटमध्ये एमआयएल एसटीडी इजेक्टर आणि सहा प्रकारच्या ड्रॉपेबल म्युनिशन्सचा समावेश आहे.



**ईर्शाद खान**
सीओओ

**झ्यूस न्युमरिक्स प्रा. लि.,**
पुष्पक बिझनेस हब,
भूमकर चौक, वाकड,
पुणे - ४११ ०५७
• ई-मेल : irshad.khan@zeusnumerix.com

# कै. किरण नातू
# **प्रथम पिढीतील उद्योजकता पुरस्कार**

केमिकल आणि इंजिनीअरिंग उद्योगात आपला वेगळा ठसा उमटविणारे कै. किरण नातू यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो. किरण नातू हे त्यांच्या कुटुंबातील पहिल्या पिढीतील यशस्वी उद्योजक होते. त्यांना औद्योगिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामासाठी सन १९९६ मध्ये चेंबरच्या गो. स. पारखे पुरस्काराने गौरविण्यात आले होते. याशिवाय सन २००५ मध्ये त्यांना नॅसकॉम न्यू प्रॉडक्ट पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांचा वारसा पुढे सुरू ठेवण्यासाठी नातू कुटुंबाने एमसीसीआयएच्या मदतीने हा प्रतिष्ठित पुरस्कार सुरू केला. कोणत्याही क्षेत्रातील पहिल्या पिढीतील यशस्वी उद्योजकाचा या पुरस्काराच्या माध्यमातून सन्मान केला जातो. विजेत्यांना ट्रॉफी, पदक आणि एक लाख रुपये रोख पारितोषिक दिले जाते.

**निवड समिती**

**ललित कुमार पाहवा**
व्यवस्थापकीय संचालक,
पाहवा मेटलटेक प्रा. लि.

**विश्वास महाजन**
अध्यक्ष,
इन्क्युबेशन अँड स्टार्टअप कमिटी,
एमसीसीआयए

**संदीप पवार**
व्यवस्थापकीय संचालक
आणि सीईओ
केंट इंटेलिजंट ट्रान्सपोर्टेशन
सिस्टिम्स इंडिया प्रा. लि.

**सुधन्वा कोपर्डेकर**
संचालक,
एमसीसीआयए

Cleanergy
Invest Your Waste

mcci a®
'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' चा

**पुरस्कारार्थी**

# प्रथम पिढीतील उद्योजकता पुरस्कार

**कै. किरण नातू स्मृत्यर्थ**

क्लीनर्जी टेक सोल्युशन्स प्रा. लि. कंपनी सेंद्रिय कचऱ्याचे रूपांतर नवीकरणीय बायोगॅस आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस सोल्युशन्समध्ये करते. ही कंपनी विविध उद्योग, संस्था आणि समुदायांकरिता विकेंद्रित बायोगॅस आणि सीबीजी प्रकल्पांची रचना आणि निर्मिती करते. त्यामुळे कचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन, तसेच कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी होऊन शाश्वत ऊर्जा यंत्रणा राबविण्यास मदत होते.

कंपनीचे काम बळकट अभियांत्रिकी क्षमता, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि भारतीय कच्च्या मालाबाबतच्या सखोल आकलनावर आधारित आहे. धनंजय अभंग यांच्या बायोमास आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील १५ वर्षांहून अधिक काळाच्या अनुभवातून क्लीनर्जी कंपनी साकारली आहे. ग्रामीण पार्श्वभूमी असल्याने श्री. अभंग यांचे नेहमीच पर्यावरण संतुलनाकडे लक्ष असते. व्यावहारिक दृष्टिकोनातून नावीन्यपूर्ण उपाय करण्यावर त्यांचा भर असतो.



**धनंजय अभंग**
संस्थापक आणि सीईओ

**क्लीनर्जी टेक सोल्युशन्स प्रा. लि.,**
फ्लॅट नं. १, कृष्णा कौमुदी अपार्टमेंट,
टेक महिंद्राजवळ,
एरंडवणे, पुणे - ४११ ००४
• ई-मेल : dhananjay@cleanergy.co.in

# कै. बी. जी. देशमुख (आयएएस)
# उद्योगांच्या सामाजिक जबाबदारीमधील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार

सामाजिक वचनबद्धतेचा प्रमुख भाग म्हणून सीएसआर अंगीकारण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्यांना प्रोत्साहन देण्याकरिता बी. जी. देशमुख (आयएएस) यांच्या स्मरणार्थ २००८ मध्ये कै. बी. जी. देशमुख (आयएएस) उद्योगांच्या सामाजिक जबाबदारीमधील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्काराची सुरुवात करण्यात आली. आरोग्य, शिक्षण, उपजीविका निर्मिती, कौशल्य विकास, पर्यावरण संरक्षण, सुरक्षा आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांचे सक्षमीकरण यांसारख्या क्षेत्रांमध्ये प्रभावी आणि शाश्वत सीएसआर उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना या पुरस्काराने सन्मानित केले जाते. लहान, मध्यम आणि मोठ्या संस्थांना हा पुरस्कार खुला आहे. जेथे दैनंदिन कामकाजाचा भाग म्हणून सीएसआर उपक्रमांचा अवलंब केला जातो, अशा युनिट्सचे नामांकन करण्याचा अधिकार उद्योगांना दिला जातो. ट्रॉफी आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**निवड समिती**

**संजय किर्लोस्कर**
अध्यक्ष,
एमसीसीआयए

**दीपक करंदीकर**
माजी अध्यक्ष,
एमसीसीआयए

**प्रदीप भार्गव**
माजी अध्यक्ष,
एमसीसीआयए

**सोनाली देशपांडे**
मुख्य विश्वस्त आणि चेअरपर्सन,
पर्सिस्टंट फाऊंडेशन

**अर्णबी मर्जित**
हेड – ह्युमन रिसोर्सेस,
ल्युपिन लि.

**सौजन्या वेगुरु**
कॉर्पोरेट सोशल
रिस्पॉन्सिबिलिटी लीडर

**सतविशा नातू**
उपसंचालक,
एमसीसीआयए

'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' चा

संयुक्त पुरस्कारार्थी

# उद्योगांच्या सामाजिक जबाबदारीमधील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार

**कै. बी. जी. देशमुख (आयएएस) स्मृत्यर्थ**

टेक महिंद्रा लिमिटेडच्या सीएसआर विभागात २०२६ पासून शिक्षणाच्या माध्यमातून सक्षमीकरण या तत्त्वाला अनुसरून कामकाज सुरू आहे. शिक्षण, रोजगारक्षमता या क्षेत्रात हे कार्य चालते. यात प्रामुख्याने महिला आणि दिव्यांग या समाजघटकांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित केले जाते.

या विभागाची प्रमुख उद्दिष्टे जगात अधिक समानता आणणे, भविष्यासाठी तयार राहणे, मूल्य निर्मिती, सक्षमीकरण, उत्तम भविष्य निर्माण करणे ही आहेत. सामाजिक परिणाम साधण्याची बांधिलकी 'महिंद्रा' च्या 'राईज' (Rise) तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे. ते मुलांना, नोकरदार तरुणांना आणि दिव्यांग जनांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत.



**जया लुहाना**
क्लस्टर मॅनेजर

**टेक महिंद्रा फाऊंडेशन,**
दुसरा-पाचवा मजला,
इयुसेबिया वेल्फेअर सेंटर,
बिल्डिंग बी, मुंढवा रोड,
पुणे - ४११ ०३६

Fleetguard® | Filtrum®

mcca®
'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' चा

**संयुक्त पुरस्कारार्थी**

# उद्योगांच्या सामाजिक जबाबदारीमधील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार

**कै. बी. जी. देशमुख (आयएएस) स्मृत्यर्थ**




**निरंजन किर्लोस्कर**
व्यवस्थापकीय संचालक

**फ्लीटगार्ड फिल्टर्स प्रा. लि.,**
१३६, पार्क मरीना रोड,
बाणेर, पुणे - ४११ ०४५
• ई-मेल : nk@fleetguard-filtrum.com


व्यवसाय सुरळीत राहून सामूहिक विकास साधण्यासाठी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीला (CSR) अत्यंत महत्त्व आहे, यावर 'फ्लीटगार्ड फिल्टर्स प्रा. लि.' चा पूर्ण विश्वास आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक एकता आणि पर्यावरणीय जबाबदारी या मूल्यांवर कंपनीचे 'सीएसआर' तत्त्वज्ञान आधारलेले आहे. कंपनीकडून शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य, पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छता, नवीकरणीय ऊर्जा आणि कम्युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर या बाबींवर काम केले जात आहे. प्रामुख्याने ग्रामीण व वंचित समाजाला याचा फायदा करून देण्याचा कंपनीचा हेतू आहे.

कंपनीचे 'सीएसआर' कामकाज कंपनीज् ॲक्ट २०१३ आणि 'संयुक्त राष्ट्रे शाश्वत विकास ध्येये' अर्थात USDGS नुसार चालते. धोरणात्मक सहभागाच्या, कर्मचारी स्वयंसेवा आणि लक्षणीय परिणामांच्या साहाय्याने दीर्घकालीन सामाजिक मूल्याची उभारणी करीत समाज आणि पर्यावरणासाठी सकारात्मक योगदान देणे, हा फ्लीटगार्ड कंपनीचा हेतू आहे.

# कै. बी. जी. चितळे
# कुटुंबाधारित उद्योगांमधील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार

महाराष्ट्रातील डेअरी उद्योगाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजाविणारे उद्योगपती कै. बी. जी. चितळे यांच्या कार्याच्या सन्मानार्थ हा पुरस्कार सुरू करण्यात आला. बी. जी. चितळे यांचे योगदान हे कृषीआधारित उद्योगांमधील नावीन्यपूर्णता, उद्योजकता आणि सामाजिक जबाबदारीचे आदर्श उदाहरण आहे. हा पुरस्कार दोन श्रेणींमध्ये दिला जातो, कुटुंबाधारित उद्योगांमधील सर्वोत्कृष्ट कामगिरी आणि कृषीआधारित किंवा डेअरी/ फूड प्रोसेसिंग बिझनेस युनिट्स. दोन्ही पुरस्कार दरवर्षी आलटून पालटून दिले जातात. शाश्वतता, सर्वोत्कृष्टता, उत्तम दर्जाचे पालन आणि संस्थेत कौटुंबिक मूल्यांचे मूर्त स्वरूप यांसारख्या निकषांवर नामांकने दिली जातात. चिरंतन उद्योग आणि जबाबदार प्रगतीचा सन्मान करणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी व प्रमाणपत्र असे आहे.

**निवड समिती**

**गिरीश चितळे**
पार्टनर,
बी. जी. चितळे डेअरी

**रमण नंदा**
व्यवस्थापकीय संचालक,
स्टेप ट्रान्सफॉर्मेशन्स प्रा. लि.

**गीता होसमाने**
सल्लागार,
एमसीसीआयए

NICHROME
Integrated Packaging Solutions

mcci
'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' चा

पुरस्कारार्थी

# कुटुंबाधारित उद्योगांमधील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार

**कै. बी. जी. चितळे स्मृत्यर्थ**



**मृणाल जोशी**
सीईओ आणि उपाध्यक्ष

**नायक्रोम इंडिया लिमिटेड,**
सफायर पार्क गॅलेरिआ, ४, पुणे-मुंबई रस्ता,
शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५
• ई-मेल : marketing@nichrome.com
• संपर्क : ८६००९ ७८६००

भारतीय पॅकेजिंग उद्योगातील आघाडीची कंपनी असलेल्या 'नायक्रोम इंडिया लिमिटेड' ची स्थापना १९४८ मध्ये झाली. ही कंपनी जोशी कुटुंबीयांकडून चालविण्यात येते. पहिली स्वदेशी मिल्क पॅकेजिंग मशीन तयार करणारी कंपनी ही 'नायक्रोम इंडिया' ची जागतिक ओळख. सचोटी, आदर आणि सर्जनशीलता या मूल्यांचा वारसा जोपासणाऱ्या या कंपनीत पारंपरिक विश्वासाची आणि आधुनिक कौशल्यांची सांगड घातली जाते.

जागतिक स्तरावर 'एंड-टू-एंड टर्नकी पॅकेजिंग सोल्युशन्स' पुरविण्यात 'नायक्रोम' चा हातखंडा आहे. याअंतर्गत, ग्राहकांना कोणत्याही उत्पादनाच्या संकल्पनेपासून ते जाहिरातीपर्यंत संपूर्ण प्रक्रियेदरम्यान मार्गदर्शन व साहाय्य केले जाते. उत्कृष्ट अभियांत्रिकी साहाय्य, व्यावसायिक नैतिक मूल्ये आणि सर्वसमावेशक साहाय्य करण्याबाबत जोशी कुटुंबीयांची अविरत निष्ठा यातून दिसून येते.

# एस. एल. किर्लोस्कर
# **सर्वोत्कृष्ट निर्यात कामगिरी पुरस्कार**

एस. एल. किर्लोस्कर सर्वोत्कृष्ट निर्यात कामगिरी पुरस्काराच्या माध्यमातून एमसीसीआयएच्या सदस्य कंपन्यांचा उत्कृष्ट निर्यात कामगिरीसाठी सन्मान केला जातो. भारताची अर्थव्यवस्था मजबूत करण्यात निर्यातीची भूमिका अधोरेखित करणे, हा या पुरस्काराचा उद्देश आहे. देशाची निर्यात वाढविण्यात पुणे आणि महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. ही बाब लक्षात घेऊन एमसीसीआयएने नेहमीच गुंतवणूक आणि जागतिक व्यापारासाठी राज्यातील कंपन्यांना पसंती दिली आहे. आंतरराष्ट्रीय व्यवसायातील उत्कृष्ट कामागिरीचा सन्मान करणारा हा पुरस्कार केवळ एमसीसीआयएच्या सदस्य कंपन्यांनाच दिला जातो. हा पुरस्कार तीन श्रेणीतील उत्पादक निर्यातदारांना दिला जातो,  लघु उद्योग, मध्यम उद्योग व मोठे उद्योग. चालू आर्थिक वर्षाच्या निर्यात कामगिरीनुसार पुरस्कार विजेत्याची निवड केली जाते. याशिवाय, मागील दोन वर्षांच्या निर्यात आकडेवारीचाही विचार केला जातो.

**निवड समिती**

**पी. सी. नंबियार**
अध्यक्ष, संचालक – ग्रुप (एक्झिम),
सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रा. लि.

**सुधन्वा कोपर्डेकर**
संचालक,
एमसीसीआयए

AMEYA
PRECISION ENGINEERS

mcca®
'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अ‍ॅग्रिकल्चर' चा

पुरस्कारार्थी

# सर्वोत्कृष्ट निर्यात कामगिरी पुरस्कार

**एस. एल. किर्लोस्कर स्मृत्यर्थ**

अमेय प्रिसिजन इंजिनीअर्स लिमिटेड या कंपनीची स्थापना १९८७ मध्ये झाली. थ्रेडिंग आणि प्रिसिजन कंपोनन्ट्सच्या निर्मितीत विशेष प्रावीण्य असलेले मशिनिंग युनिट म्हणून कंपनीची सुरुवात झाली. बळकट तांत्रिक क्षमतेमुळे जागतिक बाजारपेठेत प्रिसिजन- मशिन्ड कंपोनन्ट्सचे प्रमुख उत्पादक म्हणून कंपनीने आपली ओळख निर्माण केली आहे.

सप्टेंबर २०२२ मध्ये कंपनी नॅशनल स्टॉक एक्सचेंजवर नोंदणीकृत झाली. कंपनीस ISO 9001:2015 प्रमाणपत्रासह ZED चे रजत प्रमाणपत्र मिळाले आहे. कंपनीकडून प्रामुख्याने ऑईल अँड गॅस, पॉवर आणि न्यूक्लिअर क्षेत्रास उत्पादने पुरविली जातात. कंपनीचा ८५ टक्क्यांहून अधिक महसूल थेट निर्यातीतून येतो. याशिवाय, संरक्षण क्षेत्रासाठी पुरवठाही वाढत आहे. कंपनी मेक-इन-इंडिया धोरणांतर्गत संरक्षण क्षेत्रासाठीही कार्यरत आहे.



**शिरीष पांडे**
अध्यक्ष, कार्यकारी संचालक आणि सीएफओ

**अमेय प्रिसिजन इंजिनीअर्स लि.,**
गट क्र. ३४५, कासुर्डी,
ता. भोर, जि. पुणे - ४१२ २०५
• ई-मेल : rajesh.nagare@ameysengineers.com

# केपीआयटी टेक्नॉलॉजीज् लि.
# **शाश्वत उपक्रम पुरस्कार**

केपीआयटी टेक्नॉलॉजीज् यांच्या वतीने प्रभावी, कर्मचारीकेंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून शाश्वत नेतृत्व दर्शविणाऱ्या कंपन्यांना हा पुरस्कार प्रदान केला जातो. कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून कचरा निर्मूलनासाठी शाश्वत पद्धतींचा अवलंब आणि पर्यावरणपूरक उत्पादने व तंत्रज्ञानाचा विकास साधत अर्थपूर्ण परिणाम साधणाऱ्या कंपन्यांचा या पुरस्काराने सन्मान केला जातो. शाश्वतता हा मुख्य व्यवसायाच्या धोरणाचा गाभा बनवीत दीर्घकालीन आर्थिक व पर्यावरणीय मूल्यांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनादेखील या पुरस्काराने गौरविण्यात येते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून वर्तनाधारित बदल करण्याकरिता शाश्वत मॉडेल्सचा स्वीकार आणि पर्यावरण संतुलन राखत, उद्योगांच्या प्रगतीला चालना देणे, हा या पुरस्काराचा उद्देश आहे.

**निवड समिती**

| प्रा. गुरुदास नूलकर, पीएचडी | मानसी करंदीकर | सुधन्वा कोपर्डेकर |
|---|---|---|
| संचालक, सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स | संस्थापक सदस्य, अधिवास फाउंडेशन | संचालक, एमसीसीआयए |

‘मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड अ‍ॅग्रिकल्चर’ चा

**पुरस्कारार्थी**

# शाश्वत उपक्रम पुरस्कार

**केपीआयटी टेक्नॉलॉजीज् लिमिटेडकडून दिला जाणारा पुरस्कार**

केएसबी इंडिया लिमिटेड कंपनीची स्थापना सन १९६० मध्ये झाली. कंपनीचे मुख्यालय पिंपरी येथे आहे. कंपनीकडून ऊर्जा, उद्योग, रसायन, खाणकाम आणि पाणी यासह अनेक क्षेत्रांना पंप्स, व्हॉल्व्ह आणि त्यासंबंधी आवश्यक यंत्रणांचा पुरवठा केला जातो. देशभरात कंपनीचे सात उत्पादन प्रकल्प आहेत.

व्यवसायातील धोरण आणि कामकाजातील शाश्वतता हा कंपनीचा अविभाज्य घटक आहे. हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्यावर कंपनी भर देते. यासाठी तंत्रज्ञान आणि संसाधनांचा वापर जबाबदारीने करतो. शिरवळसह इतर प्रकल्पांमध्येही सौर आणि नवीकरणीय ऊर्जेचा वापर केला जातो. त्याला ऊर्जा संवर्धन उपाययोजना आणि रेनवॉटर हार्वेस्टिंगचीही जोड दिली जाते. कंपनीचे सर्व प्रकल्प ISO 14001:2015 अंतर्गत प्रमाणित आहेत. कंपनी सीएसआरअंतर्गत शिक्षण, आरोग्यसेवा, ग्रामीण विकास आणि स्वच्छ पाणी यासाठी विविध उपक्रम राबविते. वांबोरी येथील केएसबी गुरुकुल ही शाळा, तसेच कंपनीचे अन्य प्रकल्प हे ‘संयुक्त राष्ट्रे’ च्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत आहेत

KSB




**राजीव जैन**
व्यवस्थापकीय संचालक, केएसबी इंडिया आणि
रीजनल एक्झिक्युटिव्ह ऑफिसर, वेस्ट एशिया.

**केएसबी लि.,**
मुंबई-पुणे रोड, पिंपरी,
पुणे - ४११ ०१८
• ईमेल : rajeev.jain@ksb.com

# डॉ. आर. जे. राठी
# **हरित उपक्रम पुरस्कार**

कै. डॉ. आर. जे. राठी यांच्या स्मरणार्थ सन १९९५ मध्ये डॉ. आर. जे. राठी चॅरिटी ट्रस्टच्या वतीने सुरू करण्यात आलेला हा पुरस्कार एमसीसीआयएच्या माध्यमातून दिला जातो. उद्योगांना पर्यावरणपूरक आणि शाश्वत उपक्रमांसाठी प्रोत्साहन देणे, हा या पुरस्काराचा मुख्य उद्देश आहे. प्रदूषणमुक्त पर्यावरणासाठी योगदान देणाऱ्या हरित उपक्रमांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. महाराष्ट्रातील लहान, मध्यम आणि मोठ्या उत्पादन व सेवा संस्थांकरता हा पुरस्कार खुला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी उद्योग क्षेत्राच्या पुढाकाराने केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना मान्यता देणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी आणि प्रमाणपत्र असे आहे.

**निवड समिती**

**डॉ. संजीवनी गोगावले**
वरिष्ठ प्रशिक्षक आणि सल्लागार,
झेन इंटरनॅशनल सिस्टिम

**प्रशांत पेडणेकर**
वरिष्ठ प्रशिक्षक,
सस्टेनेबिलिटी अँड
बिझनेस एक्सलन्स

**सुधन्वा कोपर्डेकर**
संचालक,
एमसीसीआयए

EXPLOREiT
Ideation. Integration. Impact.

mcci ®
'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' चा

पुरस्कारार्थी

# हरित उपक्रम पुरस्कार

## डॉ. आर. जे. राठी स्मृत्यर्थ

एक्सप्लोरिट नेक्स्टजेन सोल्युशन्स प्रा. लि. ही कंपनी प्रामुख्याने हवा, पाणी, कचरा, ऊर्जा आणि जैवविविधता या पाच क्षेत्रांमध्ये मूर्त आणि दीर्घकालीन पर्यावरणीय प्रभाव निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे.

कंपनी आपल्या विविध उपक्रमांतर्गत हवेची गुणवत्ता सुधारणे, पाणी संवर्धन तंत्रज्ञान, कचरा व्यवस्थापन, ऊर्जेचा वापर आणि जैवविविधता पुनरुज्जीवन याकरिता ग्रीन इन्फ्रास्ट्रक्चर अर्थात् पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देते. केवळ कायदेशीर पातळीवर सीएसआर नियमांचे पालन करण्याऐवजी कंपनी बाजारपेठेतील मागणीनुसार आपल्या उपक्रमांना आवश्यक उपाययोजनांची जोड देते. यामध्ये सस्टेनेबिलिटी ऑडिट्स, वॉटरलेस युरिनल्स, ईको-फ्रेंडली पेंट्स आणि रिसोर्स एफिशिअन्सी इंटरव्हेन्शन्स यांचा समावेश आहे. कॉर्पोरेट कंपन्या, सरकार, सामाजिक संस्था, त्याचप्रमाणे विविध समुदायांबरोबर कंपनी काम करते. त्या माध्यमातून पर्यावरणीय, सामाजिक आणि ईएसजीसंदर्भातील चिरंतन मूल्ये निर्माण करण्याचा कंपनीचा प्रयत्न असतो.



**शिवम सिंह**
संस्थापक आणि सीईओ

**एक्सप्लोरिट नेक्स्टजेन सोल्युशन्स प्रा. लि.,**

७०५, फिन्सवेल, साकोरे नगर रोड,
विमान नगर, पुणे.
• ईमेल : info@exploreit.in

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स,
इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर

५०५, ए-विंग, एमसीसीआयए ट्रेड टॉवर,
४०३, सेनापती बापट रस्ता, पुणे - ४११ ०१६

+91 20 2570 9000 | info@mcciapune.com

मांडणी : मीडियानेक्स्ट इन्फोप्रोसेसर्स प्रा. लि., पुणे